# दि अभिनव सहकारी बँक लिमिटेड, डोंबिवली

मुख्य कार्यालय : पी ४८, एम. आय. डी. सी. निवासी विभाग,
उस्मा पेट्रोल पंपाजवळ, डोंबिवली (पूर्व) ४२१ २०३
दुरध्वनी क्र. (०२५१)२४३९६९०, २४३९६९९
वेबसाईट : www.abhinavbank.com

## –: बँकेच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना :–

बँकेची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता हॉटेल शिवम, प्लॉट नं. पी-१४, एल.आय.सी. ऑफिस जवळ, आर. आर. हॉस्पिटलचे मागे, एम. आय. डी. सी. डोंबिवली ( पूर्व ) येथे खालील नमुद केलेल्या विषयांवर चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेला वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

### ★ सभेपुढील विषय ★

१. दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. दिनांक ३१.०३.२०२२ अखेरच्या वर्षाचा, बँकेच्या कामकाजाचा अहवाल व वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.

३. सन २०२१–२०२२ या आर्थिक वर्षासाठी माननीय संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे नफा विभागणीस मंजूरी देणे

४. सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालावर चर्चा करणे व स्वीकृत करणे.

५. सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

६. सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे.

७. सन २०२२-२०२३ च्या अंदाजपत्रकाची नोंद घेणे.

८. माननीय अध्यक्षांच्या संमतीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानूसार
सुरेश मोहन शिंदे
उप-सरव्यवस्थापक

ठिकाण : डोंबिवली
दिनांक : १५ जुलै, २०२२

---

### ★ सूचना ★

१. गणपूर्ती अभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी वरील वेळेनंतर अर्ध्या तासाने घेण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२. कोणाही सभासदास हिशेबासंबंधी माहिती हवी असल्यास किंवा काही सूचना करावयाची असल्यास त्यांनी दिनांक ३ ऑगस्ट, २०२२ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात लेखी विचारणा करावी.

३. सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी बँकेच्या सन २०२१-२०२२ च्या वार्षिक अहवालाची प्रत व मागील दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताची छायांकित प्रत जवळची शाखा अथवा प्रशासकीय कार्यालयातून घेऊन जावी. तसेच, सदरहू अहवाल व इतिवृत्त बँकेच्या www.abhinavbank.com या वेबसाईटवर उपलब्ध असेल.

४. सभासदांना विनंती करण्यात येते की, ज्या सभासदांनी रु. १,०००/- पेक्षा कमी रकमेचे भाग धारण केले आहेत, त्यांनी आवश्यक वाढीव रकमेचा भरणा करुन किमान ४० भागांची रक्कम रु. १,०००/- लवकर पूर्ण करावी. ज्या सभासदांच्या पत्त्यात किंवा वारसदारात किंवा कायदेअंतर्गत दर्जात बदल झाला असल्यास यासंदर्भात त्यांनी बँकेस लेखी कळवावे.

५. ज्या सभासदांनी आपले भाग दाखले ( Share Certificates ) अद्याप घेतलेले नाहीत, त्यांनी ती बँकेच्या एम.आय.डी.सी. स्थित भाग भांडवल विभागातून घेऊन जावेत.

६. ज्या सभासदांच्या पत्त्यात बदल झाला आहे किंवा वारसाची नोंद केली नाही तसेच, ज्यांनी KYC दस्तावेजांची पूर्तता केली नाही त्यांनी या बाबींची पूर्तता त्वरित करुन घ्यावी.

७. सभासदांनी ओळखपत्र प्राप्त करण्यासाठी दोन पासपोर्ट साईज फोटो बँकेच्या भाग-भांडवल विभागात जमा करावे